# Supply Chain Application FAQ (FEAST)

1) User is already login असा मॅसेज FEAST मोड्युलवर लॉगीन करीत असतांना येत आहे.

उत्तर:- (Compcell.mhpds@gov.in) वर सेशन किल करण्यासाठी e-mail पाठवावा व SMS सुविधेचा वापर करावा

2) वापरकर्ता पासवर्ड विसरला ?

उत्तर:- Compcell.mhpds@gov.in वर पासवर्ड रिसेट करण्याची विनंती पाठवावी.

3) Closing Balance काय आहे?

उत्तर:- रास्त भाव दुकानामध्ये प्राप्त नियतनापैकी महिना अखेरीस वाटप न झालेल्या शिधावस्तुचा शिल्लक साठा म्हणजे Closing Balance होय.

३) ऑनलाईन नियतन (Online Allocation) काय आहे?

उत्तर:- FEAST मोड्युलचा वापर करुन नियतन महिन्यासाठी Online पध्दतीने काढलेले नियतन म्हणजे ऑनलाईन नियतन होय ?

4) Closing Balance भरणे व Online नियतन काढण्याचे वेळापत्रक काय आहे?

उत्तर :- Online नियतन काढण्यासाठी e-PDS जिल्हयामध्ये शिधापत्रिकांचा Live डाटा उपलब्ध होतो. त्यामुळे महिन्याअखेरच्या लाभार्थ्यांच्या संख्येनुसार Closing Balance सुविधा उपलब्ध होते. e-PDS सुविधा लागु नसलेल्या जिल्हयामध्ये SIMS मॉड्युलचा वापर होत असल्याने SIMS मधील रास्तभाव दुकानाचा तपशिल शिधापत्रिकांची माहिती प्रत्येक महिन्यात 1 ते 4 या तारखेदरम्यान अद्यावत करण्यात यावी. FEAST मोड्युलवर Data Port झाल्यानंतर त्या महिन्याच्या 8 तारखेपर्यंत Closing Balance भरण्याची सुविधा उपलब्ध होते.

4) शिल्लक साठा भरणे व ऑनलाईन नियतन काढणे यासाठी अंतिम दिनांक काय ?

उत्तर:- दर महिन्याला १ते ४ तारखेदरम्यान SIMS Module मध्ये दुकानाची सद्यस्थिती व दुकानाची शिधापत्रिका अद्यावत करुन तो डाटा Feaset Module ला ५ तारखेला Port झाल्यावर ५ ते ८ तारखेदरम्यान सर्व दुकानाचा शिल्लक साठा भरुन ९ तारखेपर्यंत नियतन काढणे अपेक्षित आहे.

6) महिना नोव्हेंबर आहे तर Closing Balances कोणत्या महिन्यासाठी भरावे लागेल.

उत्तर :- आपल्याला नियतन काढण्याची कार्यवाही नियतन महिन्याच्या आधीच्या महिन्यात पुर्ण करावी लागते. नियतन महिना डिसेंबर असल्यास नियतन काढण्याची कार्यवाही नोव्हेंबर महिन्यात करायची आहे. मात्र नोव्हेंबर मधील विक्रीची कार्यवाही पुर्ण झालेली नसल्याने Closing Balances आकडे ऑक्टोंबर या महिन्यातील घेणे आवश्यक राहते.

८) FEAST मोड्युल मध्ये शिधापत्रिका व त्यावरील लोकसंख्या बदलता येते का ?

उत्तर : SIMS डाटा PORT झाल्यानंतर RC/ Member संख्या दुरुस्त करण्याची सुविधा उपलब्ध नाही.

11) ऑनलाईन नियतन (Online Allocation) करण्यासाठी पुर्वबाबी काय आहेत ?

उत्तर :- ऑनलाईन नियतन (Online Allocation) करण्यासाठी खालीलप्रमाणे पुर्वबाबी तपासणे आवश्यक आहे.

१) e-PDS व्दारे Online नियतन काढण्यात येत असल्यास ते Live Data च्या आधारे काढण्यात येते.
२) SIMS चा वापर करुन ऑनलाईन नियतन काढण्यात येत असल्यास SIMS मधील रास्तभाव दुकाननिहाय शिधापत्रिकांचा तपशील अद्यावत असणे आवश्यक आहे.
३) सर्व रास्तभाव दुकाने योग्य Transport Group ला जोडण्यात आलेली आहेत.
४) सर्व रास्तभाव दुकाने योग्य गोदामाला संलग्न करण्यात आलेली आहेत.
५) FEAST मोड्युलध्ये Data Port झाल्यानंतर Closing Balances भरण्याची कार्यवाही अचुक झाली आहे.
६) Diversion of FPS सुविधेचा वापर करण्यात येत असल्यास ती कार्यवाही पुर्ण करण्यात आली आहे.
७) भरलेला डाटा अचुक असल्याची एकदा खात्री करावी.
८) उपरोक्त सर्व बाबी सर्व तालुक्यांचे बाबतीत पुर्ण झाल्यावर तालुकानिहाय डाटा Freez करावा.
९) ऑनलाईन नियतन (Online Allocation) जिल्हास्तरीय कार्यालयाने तयार करावे

१2) Diversion of FPS या सुविधेचा उपयोग काय आहे ?

उत्तर : रास्तभाव दुकानाच्या शिधापत्रिका निलंबन वा अन्य कारणाने इतर दुकानाला जोडण्यात आल्या असल्यास मूळ दुकानाला “n-part” असे जोडलेल्या दुकानाचे नाव नोंदवून FPS Status “Active” करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे अशी कार्यवाही पूर्ण झाली असल्यास Diversion of FPS सुविधेचा वापर आवश्यक नाही.

१3) मॅन्युअल व ऑनलाईन नियतनामध्ये (Online Allocation) तफावत आल्याने इंडेंट ही चुकीची तयार होत आहे?

उत्तर : Online नियतन पुर्वतयारी अचुक झाली नसल्यासच “Indent” (मागणीपत्र) चुकीचे तयार होते. प्रत्येक जिल्हास्तरीय कार्यालयास FCI कडे धान्याची मागणी नोंदवावी लागते. ही ऑनलाईन पध्दतीने तयार झालेली मागणी म्हणजेच Indent होय याव्दारे FCI ला प्रस्ताव करावयाची एकूण परिगणीत होते. सदर मागणी संबंधीत तालुक्यातील गोदामनिहाय तयार होत असल्याने गोदामातील साठयाचे व्यवस्थापन शक्य होते.

14) Indent तयार करणे म्हणजे व त्याचा वापर कसा होतो ?

Answer: शिधावाटप दुकाने ही गोदामाला संलग्न असतात व जेव्हां ऑनलाईन ॲलोकेशन आदेश काढले जातात तर दुकानाच्या मंजूर नियतनानुसार जिल्हयातील प्रत्येक गोदामाला किती साठा मिळणे अपेक्षित आहे त्याकरीता Indent जनरेट केले जाते यामध्ये त्या गोदामास जोडलेल्या दुकानांचा मंजूर कोटयाएवढे एकूण धान्यसाठयाची माहिती मिळते.

16) रिलीज ऑर्डर काय आहे?

उत्तर : जिल्हास्तरीय कार्यालयाने केलेल्या मागणीच्या आधारे FCI कडून शिधावस्तुची (गहू / तांदुळ ) वितरणाची मंजुरी प्राप्त होते. FEAST मोड्युलमध्ये यासाठी “Release Order” असे म्हणण्यात येते (प्रचलीत शब्द DO असा आहे ) या आधारे FCI कडून धान्याचे वितरण होते. सदर FCI आदेश नोंदविण्याची व्यवस्था FEAST मोड्युलमध्ये आहे.

17) Stock Receipt कशासाठी तयार करण्यात येते ?

उत्तर :- FCI गोदामामधून उचलण्यात आलेल्या शिधावस्तु (गहू, तांदुळ ) यासाठी Stock Receipt तयार करण्यात येते. राज्य गोदामात साठा स्विकारल्या नंतर त्याची नोंद केली जाते.

18) गोदामात शिल्लक साठयाची एकदा नोंद केल्यानंतर त्यामध्ये बदल करणे शक्य आहे का ?
उत्तर :- नाही सदरचा शिल्लक साठा भरतांना काळजीपूर्वक भरणे आवश्यक आहे.

19) Lifting Officer ची आवश्यकता काय आहे ?
उत्तर :- FCI Depot अथवा गहु/ तांदुळ उचल केल्यानंतर वाहतूकदाराला वाहतूक प्राधिकारपत्र (Transport Pass) द्यावा लागतो. त्यासाठी नेमण्यात आलेल्या जिल्हा प्रतिनिधीला Lifting Officer म्हणतात. FEAST मोड्युलमध्ये त्याला Stock Receipt असे संबोधण्यात आले आहे.

19) एखादी शिधावस्तू एका योजना प्रकारातुन दुस-या योजना प्रकारात बदलता येईल का?
उत्तर : आवश्यकतेनुसार अन्य योजनांसाठी उपलब्ध साठा वापरता यावा म्हणुन ही सुविधा देण्यात आली आहे. मात्र Delivery Order (D O) म्हणजे संबंधीत योजनेचा साठा उपलब्ध झाल्यानंतर रास्तभाव दुकानाला धान्य उचलीचे त्याचे समायोजन बंधनकारक आहे. रास्तभाव दुकानदाराने शिधावस्तुसाठी शासनाचे प्रदान केल्यानंतर त्याची पावती देण्यात येते. त्याला Delivery Order म्हणतात. (प्रचलणातील शब्द Permit (परमिट ) असा आहे.

21) Bulk Delivary Order का करण्यात येतात व त्याचा उपयोग काय आहे ?
उत्तर : रास्तभाव दुकानदारासाठी गोदामातुन धान्यसाठी वितरणाकरीता गोदामपालाकडे सदरची ऑर्डर पाठविण्यात येते तालुका लॉगीनमध्ये सदरची व्यवस्था देण्यात आलेली आहे.

22) Bulk Delivary Order तयार करतांना डिलीव्हॅर ऑर्डरसाठी साठा उपलब्ध नाही असा एरर मॅसेज येतो ?
उत्तर : गोदामामध्ये संबंधीत योजनेतील शिधावस्तु वितरणासाठी शिधावस्तुचा साठा पुरेसा नसल्यास डिलेव्हरी ऑर्डरसाठी साठा उपलब्ध नाही असा Massage येतो. यावेळी गोदामपालशी संपर्क करावा.